# सांगली मिरज कुपवाड परिसर

# काणेबुवा प्रतिष्ठानला मान्यता

## अतिरिक्त शालेय गुणांकन प्रतिष्ठानच्या गुरूकुलमधील विद्यार्थ्यांना लाभ : मंजुषा पाटील

प्रतिनिधी
सांगली

कलागुणांना वाव देण्यासाठी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या कलाशिक्षणासाठी अतिरिक्त गुणांकन दिले जाणार आहे. यासाठी राज्यातील काही संस्थांची निवड केली असून त्यात संगीताचार्य द. वि. काणेबुवा प्रतिष्ठानला राज्य शासनाने शास्त्रीय संगीत अध्यापनासाठी अधिकृत संस्था म्हणून मान्यता दिली आहे. प्रतिष्ठानच्या गुरूकुलमध्ये शिकणाऱ्या मुलांना त्याचा लाभ मिळणार आहे. अशी माहिती प्रतिष्ठानच्या सचिव व प्रसिध्द शास्त्रीय गायिका मंजुषा पाटील यांनी दिली.

संगीताची गोडी असणाऱ्या विद्यार्थ्यांना आता दहावीतही आनंदाने अभ्यास करता येणार आहे. दहावीच्या परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांना कला आणि क्रीडातील प्राविण्यासाठी अतिरिक्त पाच गुण दिले जातात. क्रीडामध्ये हे प्रमाण भरपूर असले तरी कला क्षेत्रातील विद्यार्थ्यांना अशा मान्यता प्राप्त संस्थांची मर्यादित संख्या आणि प्रमाणपत्र मिळविण्याची किचकट पध्दत यामुळे गुण मिळविणे अवघड होते.

याचा विचार करून शासनाने हा निर्णय घेतला आहे. त्यानुसार काणेबुवा प्रतिष्ठानमधून कलेचे प्रमाणपत्र मिळविल्यास दहावीचे विद्यार्थी अतिरिक्त गुणांसाठी पात्र समजले जातील.

काणेबुवा प्रतिष्ठानमार्फत सांगली येथे २०१४ पासून गुरूकुल संगीत विद्यालय चालविले जाते. शास्त्रीय संगीताची तालिम व शालेय मुलांमध्ये संगीताचा प्रचार व प्रसार यासाठी संस्था प्रयत्नशील आहे. पारंपरिक पध्दतीनुसार गायक घडविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. यासाठी संगीताचा वेगळा आणि सोपा अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे.

या संस्थेला आता राज्य शासनाची मान्यता मिळाल्याने विद्यार्थ्यांना अतिरिक्त गुण मिळविणे सोपे होईल. अधिक माहितीसाठी गुरूकुलच्या सांगलीतील स्टेशन चौकातील वसंतदादा पाटील स्मारक येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

**अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये...!**

- गुरूकुलमध्ये कमीत कमी चार वर्ष शिक्षण घेणे आवश्यक
- प्रवेश प्रक्रिया सोपी पण अभ्यासक्रमात सातत्यपूर्ण सहभाग आवश्यक तरच प्रमाणपत्र मिळणार.
- स्वतंत्र अभ्यासक्रम तोंडी व लेखी परीक्षा.
- गुरूकुलमध्ये सातही दिवस प्रशिक्षणाची सोय
- पुरेशी विद्यार्थी संख्या मिळाल्यास शाळामध्येही प्रशिक्षण देण्याची सोय.



मिरज : पु

मिर

आ

शहरातं
संस्थापि
पृथ्वीरा
स्मृतीि
शिक्
यावर्षी
वृषात
यांना
प्रमव